
दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com
Scan QR code to visit... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ६५ • Title - Code :- MAHMAR49513 • मंगळवार दि.२८ नोव्हेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# मनोज जरांगे पाटील बॅकफूटवर अखेर तो शब्दच घेतला मागे



**जालना (प्रतिनिधी)–लायकी नसताना आम्हाला तुमच्या हाताखाली काम करावं लागलं, असं विधान मनोज जरांगे पाटील यांनी केलं होतं. या विधानाचे ओबीसी समाजातून तीव्र पडसाद उमटले. जरांगे पाटील हे मग्रुरीची भाषा करत असल्याची त्यांच्यावर टीका होऊ लागली. राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांनी तर बहुजन आणि मुस्लिम समाजातील महापुरुषांची नावे आणि त्यांचं कर्तृत्व वाचून दाखवत यांची लायकी नव्हती काय? असा सवाल मनोज जरांगे पाटील यांना करत जरांगे यांची कोंडी केली आहे. भुजबळ यांच्या या घणाघाती हल्ल्यानंतर जरांगे पाटील बॅकफूटवर आले आहेत.**

लायकी हा शब्द तुम्ही उच्चारला. त्यावरून ओबीसी नेत्यांनी तुमच्यावर टीका केली आहे. हा शब्द वापरला हे कुठं तरी चुकलं असं वाटतं का? असा सवाल मनोज जरांगे पाटील यांना करण्यात आला. त्यावर, तुम्ही वारंवार तो शब्द लावून धरला. मला त्याबाबत कोणीच काही विचारलं नाही. तुम्ही का लावून धरलं माहीत नाही. मी तो शब्दच मागे घेतो, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. मनोज जरांगे पाटील मीडियाशी संवाद साधत होते.शिंदे समिती बरखास्त करण्याची मागणी छगन भुजबळ यांनी लावून धरली आहे. त्यावरही त्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. समितीचं काम संपणार नाही. राज्यभर मराठा समाज आहे. शासकीय नोंदी सापडणं आवश्यक आहेत. आमच्या हक्काचं आरक्षण मिळत नाही. या समितीमुळेच मराठा समाजाचं खरं आरक्षण कुठे आहे हे माहीत झालं. तीच त्यांची पोटदुखी आहे. आमच्या समाजाच्या शासकीय नोंदी ओबीसी आरक्षणात असूनही सापडायच्या नाहीत. त्या का सापडत नव्हत्या? कशामुळे? त्यांना अधिक भेद निर्माण करायचं आहे. त्यांना वातावरण दुषित का करायचं आहे. ते घटनेच्या पदावर बसले आहेत. त्यांना तो अजिबात अधिकार नाही. समिती रद्द होऊ शकत नाही. काम थांबवू शकत नाही. सरकारने तसा निर्णय घेऊ नये. ओबीसी नेत्यांच्या दबावाखाली येऊ नका. सत्य बाहेर काढणं हे सरकारचं काम आहे. समिती हेच सत्य शोधत आहे. समितीला राज्यभर काम करण्याचा अधिकार मिळालाय. ते काम ते करणार आहेत. समिती रद्द करण्याची गरज नाही. ते थांबवू शकत नाही. नाही तर मराठा समाजाच्या रोषाला बळी पडावं लागेल, असा इशाराच जरांगे पाटील यांनी दिला आहे.प्रमाणपत्रांमध्ये पेनाने खाडाखोड केली जात आहे, असा आरोप छगन भुजबळ यांनी केला होता. त्यावरही जरांगे यांनी भूमिका स्पष्ट केली. भुजबळ काहीही म्हणतील. सरकारने त्यांच्यावर विश्वास ठेवू नये. सरकारने कायद्यानुसारच काम केलं पाहिजे. तुम्ही सत्तेत आहात. आमच्या नोंदी ओरिजिनल आहेत. एकही नोंद ड्युप्लिकेट निघाली नाही. कोणत्याही अधिकाऱ्याने तसं सांगितलं नाही. असं असेल तर अधिकाऱ्यांनी सांगावं. बोगस सर्टिफिकेट असेल तर सरकारने अधिकारी नेमावेत. त्या सर्टिफिकेटची चौकशी करावी, असा बोगसपणा करणाऱ्यांना चौकशीच्या फेऱ्यात घ्यावं, असंही ते म्हणाले.

# पुरोगामी शिक्षक समिती संघटना करणार आंदोलन

## प्रलंबित समस्यांमुळे शिक्षक झाले त्रस्त

**मुल । प्रतिनिधी**

संघटनेने वारंवार विनंतीपर निवेदन देऊनही जिल्हा परिषद चंद्रपूर येथील प्राथमिक शिक्षकांची अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत . त्यासंदर्भात महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक समिती संघटनेने वारंवार पाठपुरावा केला असता कोणताही सकारात्मक परिणाम दिसून येत नसल्याने त्रस्त झालेल्या प्राथमिक शिक्षकांना न्याय मिळवून देण्यासाठी पुरोगामी शिक्षक संघटना आंदोलन करणार असल्याचे पत्र जिल्हा परिषद चंद्रपूरला दिले आहे .सेवानिवृत्त होऊनही शिक्षक मिळणाऱ्या लाभापासून वंचित असून जिल्हा परिषदेतून कोणतीही हालचाल दिसून येत नसल्याचे संघटनेचे म्हणणे असून ,कार्यरत प्राथमिक शिक्षकांच्या भविष्य निर्वाह निधीतील तफावत , एकस्तर वेतनश्रेणी बाबतीत कोर्ट निर्णयानुसार कार्यवाही , अवघड क्षेत्रातील तिसऱ्या टप्प्यातील शिक्षक समुपदेशनबाबत न्याय , एकस्तरनुसार वेतननिश्चिती , शिक्षणअहर्ता वाढीची परवानगी देण्याचे अधिकार पंचायत समितीला देणे , वेतनाच्या एक्सेल शीट व प्रमाणपत्रबाबतीत अनियमितता , वैद्यकीय प्रतिपूर्ती , सेवापुस्तक पडताळणी ,स्थायी आदेश



, वरिष्ठ वेतनश्रेणी , मुख्याध्यापक व केंद्रप्रमुख पदोन्नती , पुरस्कारप्राप्त शिक्षकांना वेतनवाढ , सातव्या वेतन आयोगाची थकबाकी , आयकर कपात फिलिंग करणे , निर्लेखीत वर्गखोल्या , संघटनेच्या तालुका स्तरावर अनियमित सहविचार सभा , आदिवासी प्रोत्साहन भत्ता यासह कित्येक समस्या प्रलंबित असून त्या तात्काळ निकाली काढण्यात याव्या असे निवेदन देत पुरोगामी शिक्षक समिती संघटना चंद्रपूरचे राज्यनेते विजय भोगेकर , राज्यसरचिटनिस हरीश ससनकर , महिलाअध्यक्ष अलका ठाकरे ,अध्यक्ष किशोर आनंदवार , सरचिटणीस सुरेश गिलोरकर , कार्याध्यक्ष गंगाधर बोढे , कोष्यध्यक्ष सुनील कोहपरे ,महिलामंच अध्यक्ष विद्या खटी , सरचिटणीस पौर्णिमा मेहरकुरे ,कार्याध्यक्ष सिंधू गोवर्धन , कोष्यध्यक्ष लता मडावी ,उपाध्यक्ष रवी सोयाम , मोरेश्वर बोंडे , विलास मोरे , जीवन भोयर , लोमेश येलमुले, नरेश बोरीकर तसेच जिल्हा कार्यकारिणी यांनी आंदोलनाची भूमिका घेतली असल्याचे प्रसिद्धीप्रमुख लक्ष्मण खोब्रागडे यांनी कळविले आहे .

## 'भावरंग 'च्या रंगात रसिक रंगले रंगवित ध्यान

# यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहातील सुरेल संगीताच्या मैफलीने रसिक मंत्रमुग्ध

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

कै.यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहामध्ये ज्येष्ठ गायक नागेश आडगावकर व त्यांना गायन साथ करणाऱ्या अंबाजोगाईतील प्रख्यात गायिका भाग्यश्री देशपांडे यांनी भावरंग हा संगीतमय कार्यक्रम यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाच्या दुसऱ्या दिवशी अतिशय रंगतदार पद्धतीने सादर केला एकूण भक्तिगीत, नाट्यगीत, गझल, अभंग अशा विविधांगी गायनाची सुरेल संगीत मैफल संपन्न झाली मराठीचे आद्यकवी मुकुंदराज,संतकवी दासोपंत यांच्या नगरीमध्ये भाववरंगची मैफल गायक रसिकांना मंत्रमुग्ध करून देणारी ठरली मैफलीत भाग्यश्री देशपांडे यांनी गायलेले जुन्या धाटणीचे 'खरा तो प्रेमा धरी लोभ मनी ' हे नाट्यगीत अत्यंत सुलभ आणि रंगतदार शैलीमध्ये सादर केले या रचनेस रसिकांची मोठी दाद मिळाली नंतर नागेश आडगावकर या युवागायकाने 'देवाघरचे ज्ञात कुणाला ' हे नाट्यगीत मोठ्या ताकदीने सादर केले जुन्या मराठी नाटकाच्या काळात गेल्याचा भास उपस्थित रसिकांना झाला अतिशय सुंदर आवाज अगदी सहजपणे हृदयाला स्पर्श करून गेल्याची भावना रसिकांनी बोलून दाखवली प्रामुख्याने मूरकी, ताना आणि फिरत हे आडगावकर यांच्या गळ्याला मिळालेले अलंकार आहेत असेच वाटले नागेश



आडगावकर आणि भाग्यश्री देशपांडे यांनी गायलेली भजन 'रचना राम का गुणगान करिये ' ही भक्तीला प्रतीकात्मकरीत्या सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणारी ठरली या रचनेमधून प्रत्यक्ष 'डोळ्यात रंग ओले भोळे अभंग ओठी ' असा प्रत्येक रसिकांना आला सखोल भावना भक्तीच्या शब्दात मांडणारी ही रचना रसिकांच्या हृदयाचा ठाव घेऊन गेली आडगावकर यांनी गायलेल्या दुसऱ्या 'वेढा रे पंढरी मोर्चे लावा भीमा तीरी ' या भक्तीरचनेतून अप्रतिम स्वरबद्धता आणि 'ब्रह्मानंदी लागली टाळी कोण देहाते संभाळी ' अशी अवस्था रसिकांची झाली.भाग्यश्री देशपांडे यांनी गायलेल्या ' सास सजन है और मै हुं ' या गझल गीताला अप्रतिम दाद मिळाली रसिकांसाठी अपूर्व अशी मेजवानी या गझल गीताने दिली कोणत्याही सप्तकातून समेवर येण्याची भाग्यश्री देशपांडे यांची धाटणी लाजवाब होती.गझल गीताच्या ओळी त्यातील भावार्थ भाग्यश्री देशपांडे यांनी आपल्या आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध केले गायनाच्या समारोपात भैरवीच्या अनोख्या प्रकाराचा प्रत्यय नाविन्यपुर्ण होता 'अवघा रंग एक झाला रंगी रंगला श्रीरंग ' देवा लई नाही लई नाही मागणं ' तर नागेश आडगावकर यांनी 'रामनाम ज्याचे मुखी धन्य तिन्ही लोकी ' या समधुर भैरवी गायनाची पद्धत प्रकर्षाने आठवणीत राहणारीच ठरली संवादिनी स्वानंद कुलकर्णी, तबला सागर पटोकार, पखवाज आसाराम साबळे व्हायोलिन अनुप कुलथे आदींनी साथसंगत केली. या मैफलीसाठी विविध ठिकाणाहून महिला,रसिक मोठया संख्येने उपस्थित होते.

# मालकाला मालक असल्याची जाणीव करून द्या–ॲड.हलकारे

**चिमूर । प्रतिनिधी**

संविधानाने सर्वांना मूलभूत अधिकार दिलेले आहे परंतु आता संविधानाचं पहिलं पान जशाच्या तसे ठेवून आतील पान फाडल्या जात आहे संविधानाने येथील प्रत्येक नागरिकाला मालक बनवलेला आहे परंतु सध्या हा मालक झोपून असल्याने या मालकाला मालक असल्याची जाणीव करून देण्यासाठी जागर संविधानाचा कार्यक्रम गावोगावी घेण्याची गरज पडत असल्याचे प्रतिपादन अमरावती येथील विचारवंत तथा ज्येष्ठविधीतज्ञ ड गणेश हलकारे यांनी केले ते संविधान दिना निमित्त शंकरपूर ग्रामपंचायत तर्फे आयोजित जागर संविधानाच्या या कार्यक्रमाप्रसंगी अध्यक्ष व प्रमुख वक्ता म्हणून बोलत होते.



या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ सतीश वारजूकर यांच्या हस्ते करण्यात आले तर या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी मुख्याध्यापक डहाके माजी सरपंच सविता चौधरी माझी पंचायत समिती सदस्य भावना बावनकर सेवा सहकारी संस्थेचे अध्यक्ष भाऊराव बावनकर माजी मुख्याध्यापक काकाजी वाघमारे, डॉ नवाज शेख,प्रा शैलेश वाघधरे, मुख्याध्यापक प्रदीप गारघाटे,व्यापारी संघटनेचे अध्यक्ष स्वप्निल बघेल,एकलव्य धीवर समाजाचे अध्यक्ष गजानन कांबडी, कदिर शेख, अरविंद गायकवाड,बलदेव खिरटकर,दुर्योधन तांबरभोगे आदी मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते. या कार्यक्रमात दहावी व बारावी पास झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला कार्यक्रमानंतर प्रकाश मेश्राम यांचे वादळ निळ्या क्रांतीचे हा प्रबोधनात्मक संगीतमय कार्यक्रम घेण्यात आला कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी उपसभापती रोशन ढोक, संचालन विजय गजबे, आभार आमोद गौरकर यांनी केले कार्यक्रमाला शेकडो लोक उपस्थित होते.

# बॅड टच केल्याच्या आरोपावरून डॉक्टर वर गुन्हा दाखल व अटक

## गडचिरोली जिल्ह्यातील आलापल्ली येथील घटना

**गडचिरोली** –आजारी असल्याने उपचारासाठी आलेल्या अल्पवयीन युवतीला बॅड टच केल्याच्या आरोपावरुन एका खासगी डॉक्टरवर गुन्हा नोंद झाला. अहेरी तालुक्यातील आलापल्ली येथे २६ नोव्हेंबर रोजी ही घटना घडली. पोलिसांनी संबंधित डॉक्टरला अटक केली आहे.पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपी डॉक्टर चा आलापल्लीत त्याचा खासगी दवाखाना आहे. अहेरी तालुक्यातील १७ वर्षीय युवती २६ नोव्हेंबरला दुपारी त्याच्या दवाखान्यात उपचारासाठी आली. यावेळी एक रुग्ण महिला बाहेर बसलेली होती. दालनात तपासणीसाठी गेल्यावर डॉक्टरने बॅड टच केला, असा आरोप युवतीने केला. नातेवाईकांसह तिने अहेरी पोलिस ठाणे गाठून तक्रार दिली.त्यावरुन रात्री विनयभंग व बाललैंगिक अत्याचार प्रतिबंध कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला.पोलिस निरीक्षक मनोज काळबांधे यांनी तपासचक्रे फिरवून तातडीने आरोपीला अटक केली.दरम्यान, २७ नोव्हेंबरला आरोपी डॉक्टरला पोलिसांनी अहेरी न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्यास न्यायालयीन कोठडी सुनावली. अधिक तपास सुरु असल्याचे पोलिस निरीक्षक मनोज काळबांधे यांनी सांगितले.

# माफसू येथे भारतीय संविधान दिन साजरा



**नागपुर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर मुख्यालयी भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला.विद्यापीठाचे कुलगुरू डॉ नितीन पाटील यांच्या हस्ते भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राला अभिवादन व संविधानाच्या प्रस्तावनेचे सामूहिक वाचन करण्यात आले. कार्यक्रमाला संचालक संशोधन व कुलसचिव डॉ नितीन कुरकुरे, संचालक विस्तार शिक्षण व अधिष्ठाता निम्नशिक्षण डॉ अनिल भिकाने, अधिष्ठाता मत्स्यविज्ञान डॉ सचिन बोन्डे, परीक्षा नियंत्रक डॉ भूषण रामटेके, उपकुलसचिव (आस्था) डॉ अजय गावंडे, उपकुलसचिव (शिक्षण) डॉ जितेंद्र वाघाये, मा कुलगुरू महोदयांचे खाजगी सचिव डॉ वकार खान, मा कुलगुरू महोदयांचे तांत्रिक अधिकारी डॉ अतुल ढोक, तांत्रिक अधिकारी (सामान्य) डॉ गिरीधर शेंडे, तांत्रिक अधिकारी पशुविज्ञान शाखा व अध्यक्ष, कास्टट्राइब माफसु कर्मचारी संघटना (नागपूर शाखा) डॉ प्रज्ञेय ताकसांडे, सहाय्यक नियंत्रक (वित्त) रामराव कीर्तने, सहाय्यक कुलसचिव महेश आंबोकर, संचालक विस्तार शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक व उपाध्यक्ष, कास्टट्राईब माफ़सू कर्मचारी संघटना (नागपूर शाखा) प्रवीण बागडे, भंडारपाल विशाल पिल्लारे व वरिष्ठ लिपिक व कोषाध्यक्ष, कास्टट्राईब माफ़सू कर्मचारी संघटना (नागपूर शाखा) संतोष बनसोड प्रामुख्याने उपस्थित होते.

## संपादकीय

# शांततेच्या फक्त सावल्या


इस्रायल आणि हमास यांच्यात जो अल्पकालीन शस्त्रसंधी होणार आहे; तो अद्याप प्रत्यक्षात आलेला नाही. मूळ तडजोडीनुसार तो एव्हाना सुरू व्हायला हवा होता. तसे झालेले नाही. शस्त्रे खाली ठेवण्यास अजून एक तरी दिवस लागेल, असे इस्रायलने म्हटले आहे. तोपर्यंत इस्रायलने आपले आक्रमण बिलकुल थांबविलेले नाही. गाझा पट्टीतील एका मोठ्या हॉस्पिटलच्या संचालक डॉक्टरांना झालेली अटक आणि लेबाननमधून इस्रायलवर डागली गेलेली क्षेपणास्त्रे यामुळे वातावरण शस्त्रसंधीला अनुकूल होण्याऐवजी प्रतिकूलच झाले आहे. तसाही हा शस्त्रसंधी केवळ चार दिवसांचा असेल. या काळात दोन्ही बाजूंनी ओलीस सोडले जातील, असे म्हटले जाते.हमासच्या ताब्यात केवळ इस्रायली नागरिक नसून इतरही अनेक देशांचे नागरिक आहेत. यात केवळ तीन वर्षांची अमेरिकी नागरिक असणारी मुलगीही आहे. ही मुलगी आणि इतरही मुले सुखरूप सुटावीत, यासाठी अमेरिका व इतरांचा काही प्रमाणात दबाव इस्रायलवर आला आहे. हा शस्त्रसंधी इस्रायली सरकारने का मान्य केला, असा प्रश्न विचारणारेही तेथे बरेच आहेत आणि त्यांचाही दबाव नेतान्याहू यांच्या युद्धकालीन मंत्रिमंडळाला जाणवत असणार. एकदा हा चार दिवसांचा शस्त्रसंधी झाला की थोडी उसंत मिळेल, जखमींना मदत पोहोचविता येईल, बेघर झालेल्यांना काही आसरा देता येईल आणि दोन्ही बाजूंनी मान्य केले तर हा शस्त्रसंधीचा कालावधी पुढेही वाढवता येईल, असे प्रयत्न विविध पातळीवर चालू होते आणि आजही चालू आहेत. ते चालू असतानाच 'हमासला नामशेष केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही,' ही प्रतिज्ञा इस्रायलमध्ये महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळणारे नेते आणि अधिकारी आळीपाळीने पुन्हा पुन्हा बोलून दाखवत आहेत. गाझा पट्टीवर ओकली जाणारी आग तूर्त थांबवून हमासचा नायनाट करण्याचा काही दुसरा मार्ग आहे का, या अंगानेही इस्रायली सरकार विचार करील, अशी अमेरिकेची अपेक्षा आहे. ती पुरी होते का, हे सध्याचा शस्त्रसंधी झाल्याशिवाय समजणार नाही.एकीकडे, ही शस्त्रसंधीची चर्चा चालू असतानाच इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी 'मोसाद' या इस्रायली गुप्तचर संघटनेला 'हमासचे दहशतवादी जगाच्या पाठीवर जिथे कुठे असतील तिथे जाऊन त्यांना संपवा,' असा आदेश दिला आहे. यातून या संघर्षाला एक नवीनच आयाम मिळण्याची भीती आहे. सध्या दोन्ही बाजूंनी संवाद साधावा, यासाठी कतारचे राजे यात लक्ष घालत आहेत. मात्र, उद्या अनेक आखाती देश किंवा अगदी युरोपमध्ये आश्रय घेतलेल्या हमासच्या दहशतवाद्यांना संपविण्याचा सशस्त्र उद्योग मोसादने चालू केला, तर कतारची मध्यस्थी तर कोंडीत सापडेलच; पण अनेक देशांमध्ये संशयित दहशतवाद्यांचे खून पडू लागले तर वातावरण आणखी चिघळू शकते. आज गाझा पट्टीत २२ ते २३ लाख रहिवासी आहेत. तेथे दोन लाख ६० ते ७० हजार एकूण घरे असावीत, असा अंदाज आहे. यातली किमान ५२ ते ५५ हजार घरे इस्रायलने आत्तापर्यंत जमीनदोस्त केल्याचे सांगितले जाते. याशिवाय, एकूण घरातील दोन तृतियांश घरांना कमी-अधिक थेट झळ पोहोचली आहे. गाझा पट्टीचा एक चतुर्थांश भाग इस्रायलने जवळपास बेचिराख करत आणला आहे. या सगळ्या आक्रमणात हजारो मुले बेघर तर झालीच, पण त्यांची पालकांशी ताटातूटही झाली. १३ ते १५ हजारांपेक्षा अधिक नि:शस्त्र नागरिक मरण पावले आहेत. हे सारे या शस्त्रसंधीने तात्पुरते थांबणार आहे की पुन्हा नव्याने आक्रमण सुरू होणार, याचे उत्तर एकटा इस्रायलच देऊ शकतो.भारताच्या पंतप्रधानांसहित अनेक जागतिक नेत्यांनी या शस्त्रसंधीचे स्वागत केले असले, तरी इस्रायल या संघर्षात अमेरिकेचेही फारसे ऐकून घेताना दिसत नाही. अमेरिकेत ज्यूंची अत्यंत बलवान लॉबी आहे आणि त्यांचे इस्रायलला पाठबळ आहेच. दुसरीकडे, गाझा पट्टीत युद्ध चालू असतानाही हमासचे समर्थन करणाऱ्या पॅलेस्टिनी नागरिकांची संख्या कमी झालेली नाही, असे काही पाहण्या सांगत आहेत. इस्रायलशी संघर्ष करण्याची हमासची भूमिका योग्यच आहे; असे गाझा पट्टीतील बहुसंख्य नागरिकांना वाटते. ही धोक्याची घंटा आहे. उद्या युद्ध संपले तरी हमासला पुन्हा नवे बळ मिळण्यासाठी अनुकूल भूमी आहे, असे दिसते. या पाहण्या खऱ्या की खोट्या, हे कुणीही सांगू शकत नाही. मात्र, त्यांच्याकडे बोट दाखवून इस्रायल 'पुरता नायनाट' हीच आपली भूमिका रेटत राहिला, तर कठीण आहे. आज गाझा पट्टीत तात्पुरतीही शांतता आली नसून या शांततेच्या केवळ सावल्या दिसत आहेत. काहीशा मवाळ पॅलेस्टिनी नेतृत्वाच्या विरोधात ज्यांनी हमासला खतपाणी घातले आणि हा भस्मासुर उभा केला; त्यांनीच आता हमासला नामशेष करण्याच्या आणाभाका घ्याव्यात, हाच खेळ वारंवार होत आला आहे. या रक्तरंजित खेळात असंख्य निष्पाप जीव जातात आणि हजारो कळ्या अकाली खुडल्या जातात. तेच चालू आहे.

# नव्या सृष्टीचे नियमन



तंत्रवैज्ञानिक प्रगतीचा वेग आणि त्यातून निर्माण होणारी सृष्टी कल्पनातीत गतीने जीवन बदलवून टाकत आहे. गेल्या तीन दशकांमध्ये आपल्या घरात आणि हातात आलेल्या तंत्रसाधनांकडे पाहिले तरी याची प्रचीती येईल. ही क्षणोक्षणी नवनिर्माण होणारी तंत्रसृष्टी सर्वस्वी फायद्याची असते असे नाही; तसेच तिचा स्वैर वापर करण्याकडेही कल असतो. या सृष्टीचे नियमन करणारी यंत्रणा, कायदे, नियम आणि बंधने यांचा वेग नेहेमीच मंद असतो. भारतात १९९५ मध्ये जन्माला आलेल्या केबल कायद्याने सर्व आधुनिक माध्यमांचे नियमन आजवर होत होते. दोन वर्षांनी या कायद्याला तीस वर्षे होतील. या काळात मनोरंजन, प्रक्षेपण, प्रसारण, दूरसंचार यांचे विश्व प्रत्यक्ष तंत्रसामग्री, प्रक्षेपणाचे तंत्रज्ञान आणि या माध्यमांमधून प्रसारित होणारा मजकूर किंवा कलात्मक आविष्कार या बाबतीत पूर्ण बदलून गेले आहे. ओटीटी म्हणजे 'ओव्हर द टॉप' या तंत्रसुविधेमुळे माहिती आणि मनोरंजनाचे नवे विश्व साकारले आहे. ओटीटी ही मुळात व्हिडिओ स्ट्रिमिंग सर्व्हिस असते. तिला इंटरनेटची सुविधा आणि मोबाईल फोनपासून लॅपटॉपपर्यंत कोणतेही साधन हवे असते. ही कमालीची सुटसुटीत, ग्राहकांना हवे ते देणारी, वेगवान आणि निर्बंधमुक्त अशी सुविधा आहे. अमेरिकेत जन्म झाल्यावर तिने सगळे जग पादाक्रांत केले. भारतात आज या व्यवसायाचा व्याप दहा हजार कोटी रुपये तरी असेल. चीनमध्ये ते एक लाख कोटी रुपये आहे. भारतात उद्या काय होईल, याची यावरून कल्पना यावी.आज लोकप्रिय ओटीटी फलाटांची संख्या दहाच्या घरात आहे. ती वाढेल. जाहिरातींसहित मजकूर किंवा सामग्री मोफत पुरविणे, विशिष्ट कार्यक्रम तितकेच पैसे घेऊन देणे किंवा ओटीटी प्लॅटफॉर्मचा वर्गणीदार बनवून सेवा देणे.. अशा तीन प्रकारे ही सेवा सध्या दिली जाते. मात्र, या सगळ्यात ग्राहकांच्या पुढ्यात येऊन पडणाऱ्या सामग्री म्हणजे कंटेंटवर ठोस नियंत्रण नव्हते. संसदेच्या हिवाळी अधिवेशनात जे नवे विधेयक मांडले जाणार आहे; त्यात या साऱ्या बाबींचा समावेश असायला हवा. माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अनुराग ठाकूर यांनी संसदेत सर्वसमावेशक विधेयक मांडले जाईल, असे म्हटले आहे. या नव्या कायद्याने ओटीटी, डिजिटल माध्यमे, डीटीएच, आयपीटीव्ही यांच्यासहित सर्वच प्रकारांचे नियमन आणि नियंत्रण करता येईल. या तंत्रज्ञानाला आणि प्रक्षेपणाला देशांच्या सीमा समजत नसल्या तरी भारतासारख्या व्यामिश्र, संवेदनशील देशात ही सगळी तंत्रसाधने मोकाट असणे किंवा सुटणेही अपेक्षित नाही. गेल्या काही दिवसांमध्ये ओटीटीवर येणाऱ्या मालिकांची कथानके, त्यांच्यातील बीभत्स चित्रणे आणि अश्लील मजकूर यांच्याविषयी वारंवार तक्रारी येत आहेत. हे सगळे केवळ परदेशात तयार होते आणि इथे दिसते, असे नाही. भारतीय निर्माते आणि दिग्दर्शकही वाढीव प्रेक्षक मिळविण्यासाठी अर्थहीन कथानकांच्या पण अश्लीलता आणि हिंसा यांचा मसाला खच्चून भरलेल्या मालिका या विश्वात फेकत आहेत. सगळे मनोरंजन विश्वच गढूळ आणि विकृत होण्याचा धोका यात आहे. नव्या कायद्याने यावर नियंत्रण येते का, हे तो कायदा मंजूर झाल्यावर आणि त्याच्या अंमलबजावणीची कार्यपद्धती ठरल्यावर समजेल.नव्या कायद्यात 'कंटेंट इव्हॅल्यूशन कमिटी' म्हणजे 'मजकूर किंवा सामग्री मूल्यमापन समिती' नेमण्याचे प्रस्तावित आहे. तीत माध्यम तज्ज्ञ आणि अधिकारी असतील. ही समिती किती वेगाने काम करून निर्णय घेते आणि मुख्य म्हणजे ती नवी तंत्राधारित कार्यपद्धती अवलंबते की जुन्याच पठडीत काम करते, यावर बरेच अवलंबून आहे. याचे कारण, या नवमाध्यमांमध्ये रोज हजारो तासांचा कंटेंट तयार होणार आहे. त्याचे नियमन, नियंत्रण आणि निर्णयन हेही अतिशय वेगाने आणि अचूक व्हावे लागेल; अन्यथा यातून उद्या कायदेशीर संघर्ष निर्माण होतील. याशिवाय, जाहिरात नियमावली आणि कार्यक्रम नियमावली यांची व्यापक देखरेख करण्यासाठी नवी 'प्रसारण परिषद'ही स्थापण्याचा प्रस्ताव आहे. या परिषदेलाही व्यावसायिक रीतीने आणि वेगाने काम करावे लागेल. नवीन कायदा येत असला तरी सर्वांनी स्वनियमन करावे, अशी केंद्र सरकारची अपेक्षा आहे. सध्याही सक्षम कायदा नसल्याने 'स्वनियमन'च चालूच आहे. ते काय दर्जाचे आहे, हे दिसतेच आहे. तेव्हा कायदा तर आणायचा आणि भाषा स्वनियमनाची करायची, असे केंद्र सरकारने करता कामा नये. नव्या कायद्याची कठोर अंमलबजावणी होईल, असेच सरकारने म्हटले पाहिजे. अनुराग ठाकूर यांनी या विधेयकाची माहिती देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'इज ऑफ डुईंग बिझनेस'चा उल्लेख केला आहे; पण त्यापुढचे 'इज ऑल लिव्हिंग' हे अधिक महत्त्वाचे आहे आणि ते केवळ व्यावसायिकांसाठी नसून कोट्यवधी प्रेक्षकांसाठी मोलाचे आहे. व्यावसायिक मार्ग काढतातच; अ-क्रियाशील प्रेक्षक किंवा ग्राहक यांची काळजी घेणे अधिक महत्त्वाचे आहे. ते नव्या कायद्याने व्हायला हवे.

# पक्षिजगतातून सुवार्ता



ठाणे जिल्ह्यातील विस्तीर्ण अशा तानसा अभयारण्याला निसर्ग, जैवविविधतेचे मोठे वरदान लाभले आहे. मुबलक वनसंपदा, पुरेशी पाणवठ्याची ठिकाणे, स्थानिक-परदेशी पक्ष्यांचा हंगामी मुक्काम, विविध प्राण्यांचा वावर आदी वैशिष्ट्ये असलेल्या या अभयारण्यात नोव्हेंबरच्या सुरुवातीला पक्षी सप्ताह पार पडला.भारतातील पक्षिशास्त्रज्ञ आणि पर्यावरणवादी डॉ. सालीम अली आणि वन्यजीव अभ्यासक मारुती चितमपल्ली यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने हा पक्षी सप्ताह होतो हे विशेष. महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे, जेथे अशा प्रकारे पक्षी सप्ताह होतो.यंदाच्या सप्ताहाचे फलित म्हणजे मलबारी कर्णा, वेस्टर्न क्राऊन वार्ब्लर अर्थात पर्ण वटवट्या, दलदली ससाणे आदी अनुक्रमे पश्चिम घाट, हिमालय, आफ्रिका, रशिया, युरोपमध्ये आढळणाऱ्या पक्ष्यांसह सुमारे ३२ नवीन प्रजाती दिसून आल्या; तर वन पिंगळा, काळा करकोचा, बहिरी ससाणा, तुरेवाला सर्पगरुड, शिंगळा, तिसा, टूइया पोपट, फुलटोचा, स्वर्गीय नर्तक, चटक, माशीमार, धोबी, तीर चिमण्या आदी एकूण १५८ पक्षी आढळले.तानसा अभयारण्यात सुमारे ३२० प्रकारच्या विविध पक्ष्यांचे वास्तव्य असले तरी हा आकडा ३४० ते ३५०च्या आसपास आहे. या अभयारण्यात नीम सदाहरित, गवताळ, पर्णगळीत, उष्ण कटीबंधीय पर्णगळीचे जंगल आदी अधिवास आढळतात.शिवाय तानसा आणि मोडक सागर धरणही याच परिसरात आहे. त्यामुळे स्थलांतरित विस्तीर्ण पाणथळ जागा लाभली आहे. पक्षी रममाण होतील, असे वातावरण येथे आहे. पक्ष्यांच्या स्थलांतराचे प्रमुख कारण म्हणजे त्या-त्या भागात होणारी बर्फवृष्टी आणि त्यामुळे वाढलेला थंडीचा कडाका. पक्षी गरम रक्ताचे असतात.त्यांच्या दृष्टीने आपल्याकडील थंडीचे प्रमाण कमी असते. प्राण्यांना केस तर पक्ष्यांना पंख-पिसे असतात. अशा वातावरणात प्राणी राहू शकतात; परंतु पक्षी वास्तव्य करू शकत नाहीत. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे पक्ष्यांना खाद्याचा तुटवडा जाणवतो. हिमवृष्टी झाल्याने खाद्य मिळेनासे होते. परिणामी शेकडो, हजारो किलोमीटरचा प्रवास करून हे पक्षी तानसासारख्या अभयारण्यात दाखल होतात.जागतिक वारसास्थळ असणाऱ्या पश्चिम घाटात तानसा अभयारण्याचा बऱ्यापैकी समावेश होतो. जगात कुठेही न आढळणारे प्रदेशनिष्ठ पक्षी केवळ पश्चिम घाटात आढळतात. मलबारी कर्ण हा वैशिष्ट्यपूर्ण पक्षीही पश्चिम घाटात आढळतो, म्हणूनच तो तानसा अभयारण्यातदेखील दिसतो.सध्या तिथे काही ठिकाणी चोरटी वृक्षतोड, प्राणी-पक्ष्यांची शिकार होते; परंतु सतर्क नागरिक, वन आणि वन्यजीव विभाग त्यावर अंकुश ठेवण्यासाठी सतर्क असतात. तसेच आऊल कन्झर्वेशन फाऊंडेशन संस्थेच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचून त्यांच्यात जैवविविधता आणि वन्य प्राण्यांच्या संवर्धन विषयी जनजागृतीचे कार्य सुरू आहे.दोन अभयारण्यांतील वन्य प्राण्यांच्या भ्रमण मार्गाच्या संवर्धनासाठी वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ मध्ये 'संवर्धन राखीव क्षेत्र' अर्थात कन्झर्वेशन रिझर्व्ह संकल्पना जाहीर झाली. त्याची अंमलबजावणी झालेली नाही.तानसा अभयारण्यासह बाजूच्या अभयारण्यांना जोडणारे संवर्धन राखीव क्षेत्र म्हणून जाहीर करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. तानसा अभयारण्य, बोरिवली राष्ट्रीय उद्यान परिसर, तुंगारेश्वर (ता. वसई, जि. पालघर), कळसूबाई-हरिश्चंद्र गड (जि. नगर), भीमाशंकर (जि. पुणे) असा एकंदरीत पश्चिम घाटाचा जंगलपट्टा संवर्धित करण्याच्या प्रयत्नांना वेग येणे आवश्यक आहे.

# प्रदूषणाचा डबलबार!

फटाक्यांच्या आवाजाने गेले दोन-तीन दिवस आणि दोन-तीन रात्रीही अनेकांचे कान किटले, धुराने आसमंत झाकोळून गेला, कागदकपट्यांच्या कचऱ्याने रस्ते ओसंडले, अनेकांच्या हृदयाची धडधड वाढली. बावरलेले मुके प्राणी जीव मुठीत धरून बसले.अर्थात माणसांविषयीच्या संवेदनाच जिथे बधिर झालेल्या असतात, तिथे अन्य जीवसृष्टीची पर्वा कोण करतो? हवा आणि आवाजाच्या प्रदूषणाच्या सर्व मर्यादा लोकांनी पार केल्या. आर्थिक-सामाजिक विषयांसंबंधी वेगवेगळे जागतिक निर्देशांक काढले जातात आणि त्यातील भारताच्या घसरत्या क्रमांकावरून वाद वगैरे होतात.पण बेबंदपणे वागण्याच्या बाबतीत क्रमवारी लावली तर निःसंशय आपल्या देशाचा क्रमांक वरचे स्थान पटकावेल. प्रश्न आहे तो हे असले स्थान आपल्याला मिळवायचे आहे का हाच. यंदा दहीहंडीपासून ते सध्या चालू असलेल्या दिवाळीपर्यंतच्या सणांमध्ये ध्वनिप्रदूषणाची पातळी कमालीची चढती राहिली.त्यातही दिवाळीत हवा आणि आवाजप्रदूषण असा डबलबार आहे! हे सगळे उच्चांक वा विक्रम नसून बेजबाबदारपणाची कमाल पातळी आहे. खरे तर फटाक्यांमुळे होणाऱ्या दुष्परिणामांचा पाढा वाचण्याची गरज नाही, इतके त्याविषयी लिहून-बोलून झाले आहे.दिल्लीच्या रुग्णालयातील श्वसन विभागाच्या डॉक्टरांनी सर्वोच्च न्यायालयातील ताज्या सुनावणीत कळकळीने सांगितले की, फटाक्याच्या धुराचा लहान मुलांच्या फुफ्फुसावर अत्यंत घातक परिणाम होतो.दिल्ली, मुंबई, पुणे येथील हवेचा दर्जा खराब होत असल्याचे आकडे रोजच्या रोज अक्षरशः आदळताहेत. तरीही स्थिती ढिम्म राहणार असेल, तर समाजाला झालेले दुखणे गंभीर आहे. निर्धारित वेळेतच फटाके वाजवावेत, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला व राज्य सरकारांनी ही वेळ निश्चित करावी, अशी सूचना केली होती.राज्य सरकार या बाबतीत तत्परतेने आणि गंभीरपणे पावले उचलेल, असा 'आरोप' कोणी करू धजावणार नाही. याचे कारण सत्ता मिळाल्या मिळाल्या मुख्यमंत्र्यांनी 'आता उत्सव विनानिर्बंध साजरे करा', असे सवंग लोकप्रियतेचे विधान केले.त्याला कोरोना काळातील निर्बंधांचा संदर्भ असला, तरी त्यामागचा राजकीय रोख पुरेसा स्पष्ट होता. जेव्हा सत्ताधाऱ्यांकडून असा 'संदेश' जातो, तेव्हा खालपर्यंत त्याचे परिणाम काय होतात, हे गेल्या दोन महिन्यांत ठिकठिकाणी किंचाळणाऱ्या ध्वनिवर्धकांच्या उपद्रवावरून आणि पोलिस त्याबाबतीत केवळ बघ्याची भूमिका घेत होते, यावरून स्पष्टच झाले.आता तर एक भयंकर टूम आली असून ती वाढत चालली आहे. सार्वजनिक उत्सवांच्या वा मिरवणुकांच्या निमित्ताने प्रकाशाचे प्रखर झोत (लेसर) सोडले जातात. त्याने काहींची दृष्टी अधू झाल्याच्या, काहींना पूर्ण अंधत्व आल्याच्या बातम्याही प्रसिद्ध झाल्या. हे प्रकाशझोत समाजातील अंधार अधिक गडद होत चालल्याचे लक्षण आहे.फ्लेक्सवरची चमकोगिरी पुरेशी वाटत नसल्याने काही कार्यकर्त्यांना हे असले प्रकार म्हणजे आपल्या राजकीय कारकिर्दीची शिडी वाटत असेल तर एकूण राजकीय संस्कृतीचेही अधःपतन किती वेगाने होत आहे, याची कल्पनाच केलेली बरी.नोकरशहांनी 'हो' म्हणायला आणि राज्यकर्त्यांनी 'नाही' म्हणायला शिकले पाहिजे, असे यशवंतराव चव्हाण एकदा म्हणाले होते. परंतु आता चांगल्या कारभाराच्या कल्पनाच बदलत चालल्या आहेत की काय, असे वाटू लागले आहे. महापालिकांनी दोन तासांच्या मर्यादेविषयी परिपत्रके काढली होती, हे खरे आहे.मात्र ते निर्बंध लोकांनी भिरकावून दिले. स्थानिक स्वराज्य संस्था, सरकार, न्यायालये हे सगळेच जर केवळ सुविचार सांगणे, आवाहने करणे एवढ्यावरच समाधान मानणार असतील, तर काही बदल घडण्याची सुतराम शक्यता नाही.हे झाले व्यवस्थेच्या उदासीनतेबाबत. पण समाजानेही सध्याच्या परिस्थितीविषयी आत्मपरीक्षण केल्याशिवाय बदल घडणार नाही. फटाके म्हणजे दिवाळीच्या आनंदाचा भाग ही समजूत अनेकांच्या मनात घट्ट बसली आहे, परंतु हा आनंद नसून आनंदाचा आभास आहे.फटाके फोडण्याच्या प्रकाराला कोणताही धार्मिक आधार नाही. ना हे प्रकार पर्यावरणाला पूरक आहेत, ना शारीरिक वा सामाजिक स्वास्थ्याला. काही शाळांमधून या बाबतीत योग्य ती माहिती दिली जाते आणि त्याचे चांगले परिणामही दिसून आले आहेत.परंतु अशा सुट्या प्रयत्नांना मर्यादा असते. त्यामुळे या बदलाची चळवळच उभी करावी लागेल. दिवाळी या सणाशी कितीतरी चांगल्या गोष्टी जोडलेल्या आहेत. त्यात रांगोळी, आकाशदिव्यांचे सौंदर्य आहे, ऋतूला पूरक अशी आहाराची योजना आहे. त्यानिमित्ताने पाककलेला वाव आहे, नातेसंबंधांचे धागे दृढ करणारा, समृद्धीची उपासना करणारा हा उत्सव आहे.त्याला फटाकेमुक्त करून त्यातील खऱ्या आनंदाच्या झऱ्याला वाट मोकळी करून दिली पाहिजे. 'सामाजिक सुधारणेस अत्यंत अनुकूल काळ सांप्रतकाळच' असे आगरकरांनी पोटतिडकीने सांगितले होते, त्याची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. त्या लेखाचा समारोप करताना त्यांनी म्हटले होते, ''...या घटकेस हातपाय न हलवणे म्हणजे जाणूनबुजून आत्महत्या करण्यास प्रवृत्त होण्यासारखे होय.'' आजच्या परिस्थितीलाही हा इशारा तंतोतंत लागू पडतो.

# पत्रकारांच्या प्रश्नावर राज्य सरकारची भूमिका सकारात्मक : संदीप काळे

## 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या अधिवेशनातील ठराव शासन दरबारी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचे मागण्या मान्य करण्याचे आश्वासन

**मुंबई–**बारामती येथे 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या राज्य शिखर अधिवेशनातील ठराव संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांनी मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांना सादर केले. यावेळी या ठरावांवर शासन सकारात्मक असून लवकरच या संदर्भात निर्णय घेतले जातील, असे आश्वासन मुख्यमंत्री, तसेच दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी दिले. सरकार मागण्यांना घेऊन गंभीर असल्याचे सांगत 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या पाठीशी असल्याचे सांगितले.१८ आणि १९ नोव्हेंबर रोजी बारामती येथे 'व्हॉईस ऑफ मीडिया'संघटनेचे राज्य शिखर अधिवेशन राज्यतील सर्व प्रमुख पत्रकारांच्या उपस्थितीमध्ये पार पडले. राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शरद पवार, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, सुशीलकुमार शिंदे, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, सुनेत्राताई पवार, ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर, कुमार सप्तर्षी, श्रीराम पवार, जयश्री खाडिलकर, प्रकाश पोहरे, संजय आवटे, चंद्रमोहन पुप्पाला आदींनी या अधिवेशनाला आवर्जून उपस्थिती लावली. पत्रकारांच्या समस्या, अडीअडचणी व संघटनेची त्याबाबतीतील भूमिका आदी विषयांवर चर्चा झाली. या चर्चेमधून ठराव घेण्यात येऊन मागण्या करण्यात आल्या. हे ठराव, मागण्या घेऊन 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व देवेंद्र फडणवीस यांच्या भेटी घेऊन त्यांना दिले. यावर तिन्ही मंत्रिमहोदयांनी तातडीने अभ्यास करून उपाययोजना करण्यासंदर्भात निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून ज्येष्ठ पत्रकार विनायक पात्रुडकर, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून पत्रकार केतन पाठक, आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडून संजय मिस्कीन हे या मागण्यांवर आभ्यास करून अंतिम मसुदा तयार करीत असल्याचे शासन दरबारी सांगण्यात आले. अधिवेशनामध्ये पुढीलप्रमाणे ठराव घेण्यात



आले होते. पत्रकारांसाठी स्वतंत्र महामंडळाची निर्मिती करून भरीव निधी उपलब्ध करून देण्यात यावा. रेडिओ, टीव्ही, सोशल मीडिया पत्रकारांना श्रमिक पत्रकार मान्यता दिली आहे, त्याचे शासकीय परिपत्रक काढण्यात यावे. पत्रकार हल्ला विरोधी कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्यात यावी. पत्रकार पाल्यांसाठी शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशासाठी कोटा ठरवून देण्यात यावा. केंद्राच्या डिजिटल मीडियाच्या नोंदणी कायद्यात बदल करावे. नियतकालिक नियमात बदल करावे. १० वर्षे पत्रकारितेत काम करणाऱ्या पत्रकारांना वैद्यकीय उपचार मोफत मिळावे. पत्रकारांचे वेतन, मानधन याबाबत धोरण निश्चित करावे. प्रत्येक जिल्ह्यात पत्रकार भवन व वसाहत निर्माण करावी. दहा वर्षे पूर्ण झालेल्या पत्रकारांना सरसकट अधिस्वीकृती देण्यात यावी. दैनिक, साप्ताहिक व रेडीओ यांना देण्यात येणाऱ्या जाहिरातींचे धोरण ठरवावे. शासन स्तरावर पत्रकार सन्मान योजना राबवावी. संदीप महाजन यांच्यावर झालेल्या हल्ल्याची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी. पत्रकारांच्या सेवानिवृत्तीचे मानधन अकरा हजारांवरून एकवीस हजार केले त्याचे शासकीय परिपत्रक तातडीने काढण्यात यावे. अशा मागण्या होत्या. शिष्टमंडळात अनेक पदाधिकारी यांचा समावेश होता. या मागण्यांचा विचार तातडीने नाही झाला तर नागपूर अधिवेशनात आंदोलनाचा झेंडा हाती घ्यावा लागेल, असा इशारा संदीप काळे यांनी दिला आहे.'व्हॉईस ऑफ मीडिया'ने अधिवेशनाच्या माध्यमातून अभ्यासपूर्ण ठराव घेतले. त्यावर निश्चितच विचार करून पत्रकार हित जोपासले जाईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. ाव-खेड्यामध्ये काम करणाऱ्या छोट्या पत्रकारांपासून सर्वांचाच विचार संघटनेने केला आहे. त्यांचे प्रश्न आणि समस्या साकल्याने मांडण्याचा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे. महामंडळासह अधिस्विकृती सारख्या सवलतींच्या बाबतीत निश्चितच अभ्यास करून निर्णय घेतला जाईल, असे यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. पत्रकार अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये काम करतात. त्यांच्या योजनांसाठी व हितासाठी शासन निधीची कमतरता पडू देणार नाही. बारामतीमध्ये अधिवेशन घेऊन राज्यभरातील पत्रकारांना बारामतीच्या विकासाची झलक दाखविल्याबद्दल 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे आभार. आम्ही नेहमी 'व्हॉईस ऑफ मीडिया' च्या पाठीशी राहू, असे आश्वासन उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी यावेळी दिले.'व्हॉईस ऑफ मीडिया'ने बारामतीमध्ये घेतलेल्या अधिवेशनाची शासनाने सकारात्मक दखल घेतली आहे. ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. यातून पत्रकारांच्या समस्या मार्गी लागण्यास निश्चितच मदत होईल. 'व्हॉईस ऑफ मीडिया' आणि शासन आम्ही दोन्ही पातळीवर हा लढा शेवटपर्यंत लढत राहू.

---

## शासनाने शिक्षणाबरोबरच ग्रंथालयासाठी विशेष बजेट तयार करावा –डॉ.वारजूकर

**चिमूर–**देशाचे शैक्षणिक धोरण बळकट करण्यासाठी ग्रंथालये विकसित करायलाच हवीत. सुशिक्षित समाजात ग्रंथालयांना योग्य स्थान देण्यासाठी सरकारने शिक्षणाबरोबरच ग्रंथालयासाठी विशेष बजेट तयार करण्याचा विचार करायला हवा. प्रत्येक गाव, शहर, वर्ग, प्रत्येक विद्यार्थी, शेतकरी, गृहिणी, व्यापारी, नोकरदार आणि देशातील प्रत्येक नागरिकापर्यंत ग्रंथालयाचा लाभ पोहोचल्यास देशातील विकासाचे खरे चित्र दिसून येईल.ग्रंथालय हा वाचकांसाठी ज्ञानाचा महासागर आहे. ग्रंथालयाशिवाय शिक्षण व सुसंस्कृत समाजाची कल्पनाच करता येत नाही. आपल्या सर्वांच्या जीवनात ग्रंथालयाचे अमूल्य योगदान आहे. आयुष्याच्या प्रत्येक वळणावर, प्रत्येक अडचणीत पुस्तके माणसाशी खऱ्या मित्रासारखी सोबतीला असतात. हे तेव्हाही सोबत असतात जेव्हा आपल्याला कोणी साथ देत नाही. ज्याला जीवनात ग्रंथालयाचे मूल्य समजले नाही, तो उत्कृष्ट जीवन जगलाच नाही. ग्रंथालये वाचकांना त्यांचे जीवन सोपे, सुलभ, उज्ज्वल आणि प्रगतीच्या मार्गावर जाण्यासाठी सतत प्रेरित



करून एक चांगला मार्ग तयार करतात. ग्रंथालयांचे जाळे जगभर पसरलेले आहे, ग्रंथालयांच्या विकासासाठी सर्वात आवश्यक म्हणजे तज्ज्ञ कर्मचारी, योग्य वाचन साहित्य आणि पुरेशा निधीसह उत्कृष्ट व्यवस्थापन. विकसित ग्रंथालये वाचकांना उत्तम सेवा देऊन देशाच्या विकासात मोलाचे योगदान होईल असे प्रतिपादन चिमूर तालुक्यातील विठ्ठल रुखमाई देवस्थान सभागृह सभागृह भिसी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय भिसी यांच्या संयुक्त विद्यमाने चंद्रपूर जिल्हा ग्रंथालय संघ वार्षिक अधिवेशन २०२३ या या कार्यक्रमाचे निमित्त ग्रंथालयाच्या वाढत्या अडचणी व शासनाची भूमिका या विषयावर मार्गदर्शन करतांना ७४ चिमूर विधानसभा क्षेत्राचे समन्व्यक तथा उपाध्यक्ष ओबीसी महासंघ महाराष्ट्र प्रदेश डॉ. सतिश वारजूकर यांनी आपल्या भासणातून संबोधित केले या वेळी,संघटक प्रदेश कांग्रेस कमिटी ओबीसी धनराज मुंगले, अध्यक्ष महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ डॉ. गजानन कोटेवार, बोरगमवार , रत्नाकर नलावडे, सचिव शामराव रामटेके, अध्यक्ष आशा भिमटे, उपाध्यक्ष किशोर शेंडे, सहसचिव प्रकाश मेश्राम, वामन मेश्राम, मंगेश रामटेके, जितेंद्र मेश्राम, कमल गोंगले,उपस्थित होते.

---

## तलवारबाजीच्या राष्ट्रीय स्पर्धेत मुलच्या चैथालीचे यश

**मूल । प्रतिनिधी**

हरिवस भगत खेळगाव राची झारखंड येथे भरलेल्या थांग ता तलवारबाजी स्पर्धेत मुलच्या चैथाली रंगनाथ पेडूकर हिने राष्ट्रीय स्तरावर तिसरा क्रमांक पटकावला.मुलं शहरातील आतापर्यत अनेक विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर आणि राष्ट्रीयस्तरावर आपल्या खेळाची चुणूक दाखवीत यश मिळाविले आहे. त्यात मूल येथील बालविकास शाळेची विद्यार्थिनी असलेली चैताली रंगनाथ



पेडुकर हिने थांग ता तलावरबाजी स्पर्धेत ५३ किलो वजन गटात यश मिळवीत राष्ट्रीय स्तरावर तिसरा क्रमांक पटकाविला. या स्पर्धेत देशातील २२ राज्यांनी सहभाग घेतला. तिच्या या यशामुळे तिचे सर्व स्तरातून कौतुक केल्या जात आहे.तिने आपल्या यशाचे श्रेय प्रशिक्षक रंगनाथ पेडूरकर, भीमानंद चीकाटे, राहुल बहादे, सहाय्यक शिक्षक विवेक हरमवार सर आणि बालविकास शाळेच्या मुख्याध्यापिका सुनीता बुट्टे यांना दिलें आहे.

---

## कोंबड बाजारावर मूल पोलिसांची धाड;सहा जण अटकेत:चिखली परिसरातील घटना

**मूल । प्रतिनिधी**

छुप्या पद्धतीने कोंबड्यांची झुंज लढवून जुगार खेळत असतांना मूल पोलीसांनी धाड टाकून ६ जणांना अटक केली आहे तर ९ दुचाकी वाहन, २ हजार दोनशे रुपये आणि तिन कोंबडे जप्त केलेले आहे .सदर घटना मूल तालुक्यातील मौजा चिखली–कन्हाळगाव मार्गांवरील जंगल परिसरात रविवारी दुपारी ४ वाजता दरम्यान घडली.चेतन नरेंद्र गोविंदवार वय १४ वर्ष रा. मूल, विकास देविदास मोहुर्ले वय ३० वर्ष रा. सिंदेवाही, माधव मडावी वय २६ वर्ष रा. सरडपार, गणेश परशुराम नन्नावरे वय ३२ वर्ष रा. लोनखेरी, मनोज दिलीप खोब्रागडे वय ३२ वर्ष रा. मारोडा, बादल भाटे रा. मोरवाही हे पोलिसांच्या हाती लागले असून त्यांच्यावर जुगार प्रतिबंधक कायद्यानुसात गुन्हा दाखल करून अटक केली आहे.सदर कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी मलिकाअर्जुन इंगळे, पोलीस निरीक्षक सुमित परतेकी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अमलदार प्रशांत गायकवाड करीत आहे.

---

## गडचिरोली जिल्हा काँग्रेसच्या वतीने संविधान दिन साजरा



**गडचिरोली –**गडचिरोली जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हा कार्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला.देशातील सर्वोच्च शक्ती कडून संविधान संविण्याचा प्रयत्न होत असताना, त्या शक्ती विरोधात एकत्र येत संविधानाचे रक्षण करून संवैधानिक मूल्य रुजविण्याचा संकल्प काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केला.यावेळी गडचिरोली जिल्हा काँग्रेस अध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे, प्रदेश सचिव डॉ. नितीन कोडवते, शहराध्यक्ष सतीश विधाते, युवक काँग्रेस प्रदेश सचिव विश्वजीत कोवासे, जिल्हाउपाध्यक्ष समशेरखान पठाण, नेताजी गावतुरे, माजी जि. प. सदस्य विनोद लेनगुरे, सहकार सेल अध्यक्ष अब्दुलभाई पंजवाणी, किसान सेल अध्यक्ष वामनराव सावसाकडे, ग्राहक सेल अध्यक्ष भारत येरमे, ओबीसी सेल कार्याध्यक्ष दिवाकर निसार, शिक्षक सेल अध्यक्ष दत्तात्रय खरवडे, सोशल मीडिया अध्यक्ष संजय चंने, गडचिरोली तालुकाध्यक्ष वसंत राऊत, सुरेश भांडेकर, हरबाजी मोरे, पांडुरंग घोटेकर, काशिनाथ भडके, महिला काँग्रेस तालुकाध्यक्ष कल्पनाताई नंदेश्वर, ढिवरू मेश्राम, नृपेश नांदनकर, शत्रूघण चौधरी, उत्तम ठाकरे, लालाजी सातपुते, धम्मदीप सहारे, राज डोंगरे, नितेश राठोड, सुधीर बांबोळे, जावेद खान, रुपेश सलामे सह मोठ्या संख्येने काँग्रेस कार्यकर्ते आणि पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

---

## विवेक विचार मंच वर्धा कडून संविधान दिन साजरा



**वर्धा प्रतिनिधी–**ंविधान दिनानिमित्त विवेक विचार मंच वर्धा जिल्हा च्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास विवेक विचार मंच वर्धा जिल्हा संयोजक राहुल मुन तसेच प्रांत समन्वयक अतुल शेंडे यांच्या उपस्थितीत अभिवादन करण्यात आले. व संविधानाची प्रस्तावना वाचण्यात आली या वेळी प्रशांत अवचट, वैभव वागदे ,अमित भित्रे,प्रवीण डडमल,शुभम इंगले,रिकेश भित्रे सह विचार मंच चे अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

---

## २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील शहीद जवान आणि मृत्यूमुखी नागरिकांना श्रध्दांजली



**वरोरा–**२६ नोव्हेंबर २००८चा मुंबईवरील दहशतवादी हल्ला हा मुंबई शहरावर १० पाकिस्तानी दहशतवाद्यांनी केलेला एक भीषण हल्ला होता. या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना आणि मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांना अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषद, व माजीसैनिक संघटना वरोरा, एअरबोर्न ट्रेनिंग सेंटर यांचेकडून, शहीद स्मारक परिसर वरोरा येथे सामूहिक श्रध्दांजली देण्यात आली.सर्व प्रथम ऑननरी कॅप्टन वामन निब्रड आणि प्रतिष्ठीत नागरिक अमन मोरेश्वर टेमूर्डे यांनी शहीद स्मारकावर पुष्पचक्र वाहून मानवंदना दिली आणि एअर व्हेटरन डी एन खापने यांच्या नेतृत्वात उपस्थित माजीसैनिक रमेश आवारी .सागर कोहळे. वसंतराव काकडे. देवराव राऊत. गजानन उपरे. सुरेश बोभाटे .ऋषी मडावी. रुपेश कुतरमारे.दौलत ढोके. प्रकाश चिकटे. गणेश धोबे.गणेश मडावी. योगेश ठेंगणे.यांनी सामुदायिकपणे श्रध्दांजली अर्पण केली.

---

## नाटक हे सामाजिक प्रबोधनाचे माध्यम – खासदार अशोक नेते

**सावली–**तालुक्यातील व्याहाड बुज येथे खास संविधान दिनाच्या निमित्ताने संगीत कलंकित ठरलयं तुझ मातृत्व या नाटकांचे आयोजन करण्यात आले होते. या नाटकाचे आयोजित उद्घाटन गडचिरोली चिमूर लोकसभा क्षेत्राचे खासदार अशोक नेते यांनी दूरध्वनीद्वारे या नाटकांचे उद्घाटन समारंभ सोहळा पार पाडला.या प्रसंगी खासदार अशोक नेते यांनी बोलतांना मी तेलगांना राज्यातील निवडणूक संबंधीत व्यस्त होतो त्यामुळे या नाटकाच्या प्रयोगाला येऊ शकलो नाही. तरी पण माझ क्षेत्रात येण झाल्यास नक्की आपली भेट घेईन. व्याहाड बुज वासिय जनतेनी दाखवलेल प्रेम व्यक्त करतो.या नाटकाचा चांगल्या तऱ्हेनी आस्वाद घ्यावा.नाटक हे समाज प्रबोधनाचे माध्यम असुन यातुन चांगले उद्बोधन घ्या.



यावेळी समस्त जनतेला संविधान दिनाच्या व येणाऱ्या नविन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा असे या प्रसंगी मोबाईल दूरध्वनीद्वारे खासदार अशोक नेते यांनी नाटकप्रेमी बांधव व भगिनींना प्रतिपादन केले.यावेळी मंचावर प्रामुख्याने सरपंच कविता बोल्लीवार,माजी उपसभापती रविंद्र बोल्लीवार, सामाजिक नेते तथा युवा काँग्रेसचे नेते कुणाल पेंदोरकर, ग्रा.प.सदस्य जनार्दन गुरूनुले, ग्रा.प.सदस्या वैशाली निकेसर, ग्रा.प.सदस्या रुपाली करकाडे, तंटामुक्ती अध्यक्ष कवडूजी ठाकुर, नव.भा.वि.शाळा व्यव. समितीचे अध्यक्ष संतोष मेश्राम,तंटामुक्ती अध्यक्ष भाषकर शेंडे, महेबुब खान पठान काका,धान्य व्यापारी रविंद्र निकेसर, महेश गड्डमवार, धान्य व्यापारी प्रविण सातपुते, देवाजी सातपैसे, नाटक आयोजक मंडळी अध्यक्ष रामदास जी गेडाम, कान्हुजी गेडाम,ज्ञानेश्वर निकोडे, अनिल अन्नमवार, मुकुंदा कुंभारे,बंडू निकेसर,तसेच सहयोगी मंडळी व मोठ्या संख्येने नाटय रसिक उपस्थित होते.

---

## वंचितच्या वतीने चिमुरात संविधानाची उद्देशिका वाचून संविधान दिन साजरा

**चिमूर–**वंचित बहुजन आघाडी तालुका चिमूर च्या वतीने २६ नोव्हेंबर सविधान दिन आयोजित करण्यात आला यावेळी संविधान दिनाच्या निमित्ताने चिमूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले व आंबेडकर कॉलनी येथील सुद्धा अभिवादन करण्यात आले तसेच वंचित बहुजन आघाडी जनसंपर्क कार्यालय वडाळा (पैकू) चिमुर येथे संविधानाचे उद्देश्य का वाचून साजरा करण्यात आला व तसेच मुंबई येथील ऍड. बाळासाहेब उर्फ प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली २५ नोव्हेंबर ला झालेल्या शिवाजी पार्क येथील विराट संविधान सन्मान महासभेच्या निमित्ताने जास्तीत जास्त



बहुजनांना कसे जोडता येईल व आदिवासी व ओबीसी समाजाच्या न्याय हक्काकरिता लढून त्यांचे प्रश्न सोडविण्याचे आव्हाहन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ.बाळासाहेब बनसोड तथा कार्यक्रमाचे उद्घाटक एन. आर. कांबळे . वंचित युवा जिल्हाध्यक्ष शुभम मंडपे, महिला आघाडी जिल्हा उपाध्यक्ष शितल सोरदे, महिला शहर महासचिव सुरक्षा अंबादे, कार्यक्रमाचे प्रस्ताविक शहराध्यक्ष शालीक थुल तर संचालन रवी शेंडे यांनी केले यावेळी यावेळी वासुदेव गायकवाड नमन लोखंडे महेश पाटील,राऊत,विकास येसांबरे, प्रवीण गजभिये, किशोर जांभुळकर, भागवत बोरकर आदी उपस्तित होते.

# संविधान सन्मान रॅलीने भद्रावती ऐतिहासिक नगरी दुमदुमली

## आमदार प्रतिभा धानोरकर यांनी संविधान सन्मान रॅलीला दाखवली हिरवी झेंडी

**भद्रावती | प्रतिनिधी**

संविधान नागरिक संवर्धन समिती भद्रावती द्वारा संविधान सन्मान दिनानिमित्त काढण्यात आलेल्या संविधान सन्मान रॅलीने अवघे भद्रावती ऐतिहासिक नगरी दुमदुमली प्रथमता भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला संविधान नागरिक संवर्धन समिती द्वारा पुष्पहार अर्पण करून बालकांच्या हाती राष्ट्रध्वज असलेल्या संविधान सन्मान भव्य रॅलीला आमदार प्रतिभा धानोरकर यांनी हिरवी दाखवून संविधान सन्मान रॅलीला सुरुवात केली. प्रसंगी तहसीलदार अनिकेत सोनवणे ,ठाणेदार बिपिन इंगळे, सामाजिक कार्यकर्ते कुशल मेश्राम, जनमंच सदस्य रवींद्र तिराणिक, अजय पाटील, सुरज गावंडे, मुख्य संयोजक राजरतन पेटकर प्रामुख्याने उपस्थित होते.

नाग मंदिर रोड येथून सुरुवात झालेल्या रॅलीमध्ये शाळा महाविद्यालयीन बालकांपासून तर मोठ्यापर्यंत हजारो स्त्री-पुरुष व युवकांचा सहभाग होता. संविधान प्रबोधन देखावे, लेझीम पथक, बँड पथक, आदिवासी सांस्कृतिक पारंपारिक नृत्य समूह, पथनाट्य, संविधान रथ यासह नाविन्यपूर्ण वेशभूषेसह अनेक शाळा महाविद्यालय विद्यार्थी, विविध स्तरावरील कार्यालयात सामाजिक सेवा संस्था व त्यांचे प्रतिनिधी आदींचा संविधान सन्मान रॅलीत मोठ्या प्रमाणात सहभाग होता. प्रसंगी रॅलीत सहभागी असणाऱ्या



शाळा महाविद्यालय विद्यार्थ्यांना विविध स्तरावर सामाजिक सेवा संस्थेच्या माध्यमातून बिस्किट व फळे वाटप करण्यात आले. विविध संविधान देखावे पाहण्यासाठी नागरिकांनी एकच गर्दी केली होती. रॅली दरम्यान शहरातील सर्वच महापुरुषांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आले. विविध जाती, धर्मातील आणि समुदायातील लोकांची उपस्थिती असल्याने राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन संविधान सन्मान रॅलीतून घडले. रॅलीची सांगता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ मालाअर्पण करून अभिवादन करीत संविधानाचा सन्मान व संविधानाबाबत निष्ठा राखण्याची शपथ घेण्यात आली. दुपारच्या सत्रात डॉ .बाबासाहेब आंबेडकर चौक जुना बस स्थानक येथील विचार मंचावर संविधान दिनानिमित्त माणुसकीची सुरक्षा कवच आणि भारतीय संविधान भारतीय संविधान आणि भारतीय नागरिकांची जबाबदारी भारताचे संविधान धर्मनिरपेक्षतेचा उचिताअर्थ. भारतीय संविधान व आजची राजकीय परिस्थिती या विषयावर जिल्हास्तरीय विविध वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांनी सहभाग दर्शवला. यामध्ये गट मधून (अ )मधून काव्या कवाडे प्रथम, गौरवी भिसे द्वितीय, प्रकाश उंमरे तृतीय, गट (ब) किरण वाकुडकर/ प्रलय मशाखेत्री प्रथम द्वितीय संविधान अवताडे, तृतीय प्रेम जरपोटवर, प्राविण्य प्रोत्साहन पर नैतिक कोंगरे, इत्यादी वक्तृत्व स्पर्धेतील स्पर्धकांचा बक्षीस वितरण प्रसंगी उपस्थित मान्यवर पाहुण्यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. सायंकाळ ला भव्य संविधान प्रधान सभेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पाटील कोचिंग अकॅडमी चे संचालक अजय पाटील, स्वागताध्यक्ष राजरतन पेटकर, संविधान प्रबोधन कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते व मार्गदर्शक संभाजी ब्रिगेडचे महाराष्ट्र प्रदेश संघटक तुषार उमाळे, अनिकेत दुर्गे, प्रमुख अतिथी म्हणून वंचित बहुजन आघाडीचे महाराष्ट्र कार्यकारी सदस्य कुशल मेश्राम, जनमंच सदस्य तथा अ. भा. ग्रामीण पत्रकार संघाचे महाराष्ट्र प्रदेश संपर्कप्रमुख रवींद्र तिरानिक, भीम आर्मी महाराष्ट्र महासचिव शंकर मून, भीम आर्मी जिल्हाध्यक्ष सुरेंद्र रायपुरे, सुरज गावंडे, इंजि.प्रकाश पिंपळकर, विशाल बोरकर, डॉ.अमित नगराळे, संदीप ढेंगळे, सुशील देवगडे मा. नगरसेवक, सुनील मेश्राम, ,रत्नाकर साठे, शाहिस्ता खान पठाण , मिलिंद वाघमारे, बिपिन देवगडे, मिलिंद शेंडे, नितेश बानोत आदी प्रामुख्याने उपस्थित होते. पाहुण्यांच्या उपस्थितीत वक्तृत्व स्पर्धेतील व विविध क्षेत्रातील गुणवत्ता प्राप्त महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले प्रसंगी विविध सामाजिक क्षेत्रातील युवा, महिला, पुरुष मंडळीं व एनजीओ सत्कार करण्यात आला. सुरुवातीला संविधान सन्मान दिनाच्या प्रबोधन पर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राची वेलेकर यांनी केले संचालन भाग्यश्री शेंडे व सोनू चौधरी ,आभार प्रदर्शन मनोज पेटकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरता संविधान नागरिक संवर्धन समितीतर्फे राजरतन पेटकर, अनिकेत रायपुरे, प्रणय कांबळे, बादल बाराहाते, थॉमस दुधे, संकेत चिमूरकर, सोनू सिंग, पनवेल शेंडे, सुमित हस्तक, कूलिन शेंडे, फैयाज शेख, सोनू बानागिरी, सिद्धार्थ पेटकर, वैभव पाटील, मारुती जांभुळे, कल्पना देवगडे, सुनिता खंडाळकर, विभा बेहरे, सोनू चौधरी, रेणुका साने, मानसी देव, भाग्यश्री शेंडे, विश्रांती उराडे, शब्बू रामटेके, प्राची वेलेकर, प्रीती रायपुरे, वैशाली पाटील, शिल्पा नगराळे, मालती पाटील, किरण कवाडे, झरणा सरकार, आदी संयोजन कमिटीचे कार्यकारी प्रतिनिधींनी अथक परिश्रम घेतले.

# नवव्या अजिंठा-वेरूळ आंतराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची अधिकृत घोषणा

## नवव्या अजिंठा-वेरूळ आंतराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या नवीन बोधचिन्हाचे अनावरण व वेबसाईटचे पुर्नप्रदर्शन कार्यक्रम संपन्न

**छत्रपती संभाजीनगर**–जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट मराठवाड्यातील रसिकांपर्यंत पोहोचवणाऱ्या नवव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या नवीन बोधचिन्हाचे अनावरण व वेबसाईटचे पुर्नप्रदर्शन आज एमजीएम विद्यापीठाच्या व्ही.शांताराम सभागृहात मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. यावर्षीचा अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव दिनांक ३ जनेवारी २०२४ ते दिनांक ७ जानेवारी २०२४ दरम्यान संपन्न होणार असल्याची अधिकृत घोषणा आज यावेळी करण्यात आली.यावेळी, अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे संस्थापक नंदकिशोर कागलीवाल, प्रमुख सल्लागार अंकुशराव कदम, एमजीएमचे कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, निलेश राऊत, डॉ.प्रविण सूर्यवंशी, डॉ.अपर्णा कक्कड, अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके, प्रशासकीय अधिकारी प्रेरणा दळवी, डॉ. आनंद निकाळजे, प्रा.शिव कदम, स्मार्ट सिटी पदाधिकारी, एनएसबीटी पदाधिकारी, आयनॉक्सचे अधिकारी, प्रोजोनचे अधिकारी व सर्व संबंधित उपस्थित होते.महोत्सवाचे दिग्दर्शक अशोक राणे यांनी यावेळी दुरदृश्यप्रणालीमार्फत उपस्थितांशी संवाद साधला. यावेळी बोलताना ते म्हणाले, या आपल्या चित्रपट महोत्सवात वैविध्य राहील याची आपण विशेष काळजी घेतली आहे. विशेषत: एका ठिकाणी जगभरातील अनेक चित्रपट पाहण्याची संधी रसिकांना




या माध्यमातून मिळणार आहे.जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट मराठवाड्यातील रसिकांपर्यंत पोहोचवणाऱ्या नवव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची घोषणा करण्यात आलेली आहे. नाथ ग्रुप, महात्मा गांधी मिशन व यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र छत्रपती सांभाजीनगर प्रस्तुत व मराठवाडा आर्ट कल्चर व फिल्म फाउंडेशन आयोजित अजिंठा वेरूळ इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल हा महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने संपन्न होत असून प्रोझोन मॉल यांचे विशेष सहकार्य या फेस्टिव्हलला मिळालेले आहे. एनएफडीसी व सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांची सहप्रस्तुती असणार आहे. नाथ स्कूल ऑफ बिजनेस मॅनेजमेंट ॲण्ड टेक्नॉलॉजी, अभ्युदय फाउंडेशन हे या महोत्सवाचे सह आयोजक आहेत. एमजीएम स्कूल ऑफ फिल्म आर्टस या महोत्सवाचे अकॅडमीक पार्टनर आहेत.असोसिएशन ऑफ सर्जन्स ऑफ इंडियाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल डॉ. प्रविण सूर्यवंशी, सिएमआयच्या कोषाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अथर्ववेष नंदावे तसेच या चित्रपट महोत्सवाचे संकेतस्थळ बनविल्याबद्दल निखिल भालेराव व स्वप्नील खरे आदींना यावेळी मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या महोत्सवात ४० पेक्षा अधिक चित्रपट दाखविण्यात येणार असून आज झालेल्या कार्यक्रमात यातील निवडक चित्रपटांचे ट्रेलर्स दाखविण्यात आले. या कार्यक्रमात नंदकिशोर कागलीवाल, अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ आदि मान्यवरांनी यावेळी आपले विचार मांडले. या आजच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक निलेश राऊत यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शिव कदम यांनी तर आभार आभार आनंद निकाळजे यांनी मांडले.

# शिवाणीपाठ येथे आदिवासी बांधवांतर्फे सल्ला गांगरा शक्ती स्थापना,सप्तरंगी ध्वजारोहण तथा सामूहिक विवाह सोहळा



**अहेरी**–तालुक्यातील शिवनीपाठ येथे संविधान दिनाच्या दिवशी ७१ गाव संघटना तथा शिवनीपाठ गाव समितीच्या वतीने काली कंकाली चौकात सल्ला गांगरा शक्ति स्थापना, सप्तरंगी ध्वजारोहण, सामूहिक विवाह सोहळा व सामाजिक-सांस्कृतिक प्रबोधन मेळावा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अजय कंकडालवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.

कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून आदिवासी विद्यार्थी संघाचे सरसेनापती नंदू नरोटे,व अजय कंकडालवार,प्रमुख पाहुणे म्हणुन,पंसच्या माजी उपसभापती सोनाली कंकडालवार, माजी पस उपसभापती गीता चालूरकर, नगरपंचायतीच्या अध्यक्ष रोजा करपेत , तेलंगणाचे नेहरू मडावी, विचारवंत विश्वेश्वर दरो, माजी जिप सदस्य अजय नैताम, विविध गावचे सरपंच व पदाधिकारी मंचावर उपस्थित होते.कार्यक्रमात सकाळी धार्मिक विधी व मूठ पूजाकरण्यात आली.यावेळी भूमक म्हणून तुकाराम शेडमाके, डॉ कुसणाके, संजू सीडाम, डॉ. कोडापे हजर होते. त्यानंतर सप्तरंगी ध्वजारोहण करून सामूहिक विवाह सोहळा मंत्रचाराच्या व अजय भाऊ कंकडालवार यांच्या उपस्थितीत पार पडला. सायंकाळी सह भोजनानंतर गोंडी सांस्कृतिक नृत्य व गोंडी कलाकारांचा सत्कार व प्रबोधन मेळावा घेण्यात आला. सत्कारमूर्ती म्हणून गायक सुरेश वेलादी, विकास कुळमेथे, पांडुरंग मेश्राम तसेच तेलंगाना व उटनुरचे अनुक्रमे नरेश सोयाम, प्रवीण वलका यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाला तालुक्यातील विविध गावाचे सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, समाजाचे पदाधिकारी, बहुसंख्य नागरिक व पाहुणे उपस्थित होते.शीवणीपाट येथील सामाजिक प्रबोधनात्मक कार्यक्रम व सामूहिक विवाह सोहळा समितीचे अध्यक्ष सत्यवान तलांडे, उपाध्यक्ष दिनेश आलम ,सचिव देविदास पोर्टेट , हनुमंत कुळमेथे, सदाशिव कोडापे व इतर सदस्यांनी कार्यक्रमासाठी मेहनत व परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे आयोजक म्हणून मधुकर वेलादी व दशरथ तलांडी यांनी काम पाहिले.सोबतच मंचावर एटापलीचे तालुकाध्यक्ष बंडू मट्टामी, माजी पस सभापती सुरेखा आलम, छायाताई पोर्टेट, ज्योती सडमेक, विलास गलबले, महेश बांकेवार, खमणचेरुचे सरपंच सायलू मडावी, वांगेपल्लीचे सरपंच दिलीप मडावी, कोठारीच्या सरपंच रोशनी कुसणाके, माजी सभापती नामदेव कुसणाके, कालिदास कूषणाके, अशोक एलमुले, गुलाबराव सोयाम, प्रमोद आत्राम मंचावर उपस्थित राहून विविध गावांचे प्रतिनिधित्व त्यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधाकर वेलादी, सरपंच उमेश कडते, रामलू कुडमेथे यांनी केले.

# सुरजागड प्रकल्पाच्या खमनचेरू पार्कींग यार्डमध्ये वाहन चालकांचा अपघाती मृत्यू

### कुटुंबियांना आर्थीक मदत करावी अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

**मूल | प्रतिनिधी**

**मृत्तकाच्या कुटुंबियांना आर्थीक मदत करा: मंगेश पोटवार**

**मूल तालुक्यातील उश्राळा येथील सचिन प्रभाकर चिताडे हा सुरजागड लोहप्रकल्पामधील कच्चा मालाची वाहतुक करण्यासाठी खमनचेरू पार्कींग यार्ड मध्ये ट्रक उभे करून वाहनाचा नंबर लावुन असताना एका ट्रक ट्रेलरने त्याला धडक दिल्याने तो जागीच ठार झाला, कुटुंबातील कर्ता व्यक्ती अपघातात ठार झाल्याने तिवाडे कुटुंबिय आर्थीक संकटात सापडलेला आहे, त्यांच्या कुटुंबियांना कंपनीने आर्थीक मदत करावी अन्यथा कच्चा माल घेवुन येणारे वाहन मूल तालुक्यातील केळझर मालधक्का यार्डवर येवु देणार नाही असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे मूल तालुकाध्यक्ष मंगेश पोटवार यांनी दिला आहे.**

सुरजागड लोह प्रकल्पातील कच्चा माल नेण्यासाठी खमनचेरू पार्कींग यार्ड मध्ये वाहन उभे करून आराम करीत असलेले वाहन चालक सचिन प्रभाकर तिवाडे यांना दुसायाच वाहन चालकाच्या हलर्गीजणामुळे त्यांचा अपघात होवुन ते जागीच ठार झाल्याची घटना अहेरी पोलीस स्टेशन हदीतील खमनचेरू पार्कींग यार्ड मध्ये २३ नोव्हेंबर रोजी घडली. अहेरी पोलीस स्टेशन मध्ये वाहनचालकावर गुन्हा दाखल केला आहे. परंतु कुटुंबातील कर्ता व्यक्ती मृत्युमुखी पडल्याने संपुर्ण कुटुंबिय आर्थीक विवंचनेत सापडले असुन कुटुंबाचा गाळा कसा हाकलायचा असा प्रश्न कुटुंबियांवर पडला आहे. सदर आपदग्रस्त कुटुंबियांना आर्थीक मदत करावी अशी मागणी कुटुंबियांनी केली असुन ३ दिवसात आर्थीक मदत न मिळाल्यान कुटुंबियासह जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसुन असा इशारा मृत्तकाची पत्नी आशाताई सचिन तिवाडे यांनी दिला आहे.गडचिरोली जिल्हयातील एटापल्ली तालुक्यात सुरजागड लोह प्रकल्प कार्यान्वीत आहे, सदर लोहप्रकल्पातुन हजारो हायवा ट्रक मधुन कच्चा मालाची वाहतुक केली जाते, याठिकाणाहुन मोठया प्रमाणावर वाहनाची रेलचेल होत असल्याने प्रकल्प व्यवस्थापनाने अहेरी जवळ खमनचेरू पार्कींग यार्ड कंपनीने उभारले आहे. यापार्कींग मध्ये २३ नोव्हेंबर रोजी विश्वास टेऋडर्सचे ट्रक चालक सचिन प्रभाकर तिवाडे वय ३५ वर्षे हे आपले वाहन क्रं. सीजी ०८ एबी २९८६ हे वाहन सुरजागड लोह प्रकल्प कंपनीतील कच्चा माल भरून नेण्यासाठी नंबर लावुन थांबलेला होता. दरम्यान ट्रक टेऋलर क्रं. एम एच ४० सी एम ७७१९ च्या मागील टायरखाली दबुन त्यांचा मृत्यु झाला. पार्कींग यार्डमधील विज पुरवठा पहाटे ४ वाजता दरम्यान खंडीत झाली होती त्यावेळी सदर अपघात घडला असावा अषी शंका यावेळी पार्कींग यार्ड मधील कर्मचाायांनी व्यक्त केली आहे.अहेरी पोलीसांनी संशयीत आरोपी वाहन चालक सोहन घणराम सिरसाम वय २८ वर्षे रा. परसिया झॉकी छिन्दवाडा याला अटक करून भादवी २७९, ३०२ अ, मोटर वाहन अधिनियम १९८८ कलम १८४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास अहेरी पोलीस करीत आहे.

# अमरावती येथे होणाऱ्या राज्यस्तरीय १९ वर्षाखालील कबड्डी स्पर्धेत सिरोंचा तालुक्यातील मुलींची निवड

## माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी केली आर्थिक मदत

**गडचिरोली | प्रतिनिधी**

जल्ह्याच्या शेवटच्या टोकावर आणि तेलंगणा राज्य सीमेवर असलेल्या सिरोंचा तालुक्यातील मुलींनी कबड्डी स्पर्धेत संपूर्ण जिल्ह्याच् नाव आज मोठं केलं आहे,आज संपूर्ण गडचिरोली जिल्ह्यात त्यांचं कौतुक होत आहे आणि शुभेच्छाचा वर्षाव त्यांच्यावर करण्यात येत आहे.अम्युचर कबड्डी असोसिएशन ऑफ विदर्भ अंतर्गत १९ वर्षाखालील (मुली) राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी सिरोंचा तालुक्यातील मुलींची निवड झाली आहे.ही अभिमानाची बाब गडचिरोली जिल्ह्यासाठी आहे.तसेच त्यांची राज्यस्तरीय स्पर्धा अमरावती जिल्ह्यातील परतवाडा या ठिकाणी होणार आहे.या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी कबड्डी खेळाडू मुलींना आर्थिक अडचण निर्माण झाली होती,ही कबड्डी खेळाडू मुलींची अडचण कार्यकर्ते यांनी माजी राज्यमंत्री तथा माजी पालकमंत्री राजे अम्ब्रीशराव आत्राम यांच्या पर्यंत पोहोचविली,त्यावेळी राजे साहेबांनी कार्यकर्ते यांच्या माध्यमातून २० हजार रुपये आर्थिक मदत त्या कबड्डी खेळाडू मुलींना केली.पुढील स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. त्यावेळी संपूर्ण कबड्डी खेळाडू मुलींनी राजे साहेबांचे मनःपूर्वक आभार मानले.माजी राज्यमंत्री तथा माजी पालकमंत्री राजे अम्ब्रीशराव आत्राम हे नेहमीच आपल्या क्षेत्रातील युवक-युवतींना क्रीडा क्षेत्रात आपली प्रगती करून, क्रीडा क्षेत्रात जिल्ह्याचं नावलौकिक करण्यासाठी प्रोत्साहन देत असतात आणि सर्वतोपरी त्यांना सहकार्य करत असतात आणि त्यांनी आज पर्यंत अनेक युवा वर्गाला सहकार्य केले आहे.



यावेळी सिरोंच्या तालुक्यातील राजे साहेबांचे कार्यकर्ते शंकर नरहरी, माधव कासर्ला, सीतापती गट्टू,रमेश मुंगीवार,राजेश संतोषपु,मुरली मारगोनी,शाम बेज्जनी, चंद्रय्या सदनपू, हरीश कोत्तवडला तसेच विद्यार्थिनीं व कबड्डी प्रशिक्षक मादेशी उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .